मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# घनकचरा व्यवस्थापनावर महापालिकेचा फोकस

## पर्यावरण मंत्रालयाने जाहीर केलेल्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई; आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांचे निर्देश

**पिंपरी | प्रतिनिधी**

केंद्र शासनाने अधिसूचित केलेल्या 'घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६' च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी पिंपरी-चिंचवड महापालिकेने कंबर कसली आहे. या अनुषंगाने महापालिकेच्या आरोग्य विभागातर्फे शुक्रवारी (दि.५) ग.दि. माडगूळकर नाट्यगृहात विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यशाळेत नवीन नियमांची माहिती देत, शहर विद्रूप करणाऱ्यांवर थेट गुन्हे दाखल करण्याचे कडक निर्देश आयुक्तांनी प्रशासनाला दिले. पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाने जाहीर केलेल्या या नियमांची अंमलबजावणी १ एप्रिलपासून सुरू झाली आहे. तसेच, सर्वोच्च न्यायालयानेही या नियमांचे काटेकोर पालन करण्याचे निर्देश दिले आहेत. याच पार्श्वभूमीवर महापालिकेच्या सर्व संबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना नव्या नियमांची माहिती देण्यासाठी या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.



कार्यशाळेत मार्गदर्शन करताना आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी म्हणाले की, स्वच्छ, हरित आणि शाश्वत शहर उभारण्यासाठी प्लास्टिकचा वापर कमी करणे आणि कचऱ्याचे स्रोतस्तरावर (उगमस्थानी) वर्गीकरण करणे ही काळाची गरज आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार मोठ्या आस्थापनांना नियमांच्या पालनासाठी आवश्यक ते मार्गदर्शन केले जाईल. प्रत्येक नागरिकाने शहराला स्वतःचे घर समजून स्वच्छतेसाठी सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले

शहरातील गृहनिर्माण संस्थांमध्ये कचरा व्यवस्थापनाबाबत जनजागृती करण्यासाठी यापुढे विशेष कार्यशाळा घेतल्या जातील. लोकसहभागातूनच सुंदर शहर घडू शकते, असा विश्वास व्यक्त करत त्यांनी फूटपाथ, रस्ते आणि अतिक्रमणांवरील कारवाई यापुढेही तीव्र राहणार असल्याचे स्पष्ट केले. भविष्यात पिंपरी-चिंचवड शहर देशात स्वच्छतेत अग्रस्थानी असेल, असा विश्वास त्यांनी वर्तवला..

### गुणवंत कर्मचाऱ्यांचा सन्मान

» याच कार्यक्रमात आयुक्तांच्या हस्ते 'माझी वसुंधरा ५.०' अभियानात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या उद्यान, पर्यावरण आणि आरोग्य विभागातील गुणवंत कर्मचाऱ्यांचा विशेष सन्मान करण्यात आला. अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम यांनी सांगितले की, नवीन नियमांमुळे घनकचरा व्यवस्थापन अधिक शिस्तबद्ध आणि उत्तरदायी होणार आहे. यासाठी विभागीय समन्वय, नियमित निरीक्षण आणि नागरिकांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा ठरेल.

### नियमांची व्यापक जनजागृती करणार

» कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात उपआयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल यांनी घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६ मधील विविध कायदेशीर तरतुदींची सविस्तर माहिती दिली. कचऱ्याचे वर्गीकरण, संकलन, वाहतूक, प्रक्रिया आणि विल्हेवाट यासंदर्भातील जबाबदाऱ्या स्पष्ट करत, नियमांच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी शहरात व्यापक जनजागृतीला प्राधान्य दिले जाईल, असे त्यांनी सांगितले.

# पंतप्रधान मोदींच्या 12 वर्षांच्या कार्यपूर्तीनिमित्त 'नरसिंह महायज्ञ'...

## विकसित भारत 2047 संकल्पनेला आध्यात्मिक बळ देण्यासाठी इस्कॉन, कात्रज येथे आयोजन

**पिंपरी | प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकारच्या १२ वर्षांच्या कार्यपूर्तीनिमित्त मंगळवारी (दि. ९ जून) पुण्यात भव्य 'नरसिंह महायज्ञ' आयोजित करण्यात आला आहे. राज्यसभेचे माजी खासदार अमर साबळे आणि भारतीय जनता पक्षाच्या वतीने हा धार्मिक व सामाजिक उपक्रम श्रीकृष्ण मंदिर, इस्कॉन, कात्रज येथे दुपारी ३.३० वाजता होणार आहे.



पिंपरी येथे आयोजित पत्रकार परिषदेत अमर साबळे यांनी मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशाने विकासाच्या नव्या पर्वात प्रवेश केल्याचे सांगितले. विकसित भारत २०४७ या संकल्पनेला आध्यात्मिक बळ मिळावे, तसेच राष्ट्राच्या प्रगतीसाठी सामूहिक प्रार्थना व्हावी, या उद्देशाने महायज्ञाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली.

या महायज्ञात अनेक दाम्पत्ये लक्ष्मीनारायण स्वरूपात सहभागी होऊन राष्ट्रकल्याणाचा संकल्प करणार आहेत.

पत्रकार परिषदेला भाजपा शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे, सदाशिव खाडे, माऊली थोरात, अॅड. मोरेश्वर शेडगे आणि विजय शिनकर उपस्थित होते.

# पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयात कडक शिस्त

## फुगेवाडी विषारी दारूकांडानंतर आयुक्त विनय कुमार चौबे यांचा निर्णय; डीसीपी ते ठाणे प्रभारीपर्यंत सर्वांना स्थानिक उपस्थिती बंधनकारक

**पिंपरी | प्रतिनिधी**

फुगेवाडी विषारी दारूकांडानंतर पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयात प्रशासकीय शिस्तीचा बडगा अधिक तीव्र करण्यात आला आहे. वारंवार सूचना देऊनही काही ठिकाणी अवैध धंद्यांकडे झालेले दुर्लक्ष आणि त्यातून निर्माण झालेल्या गंभीर परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पोलिस आयुक्त विनय कुमार चौबे यांनी आता अधिकाऱ्यांना थेट जबाबदारीच्या चौकटीत आणण्यास सुरुवात केली आहे. याचाच भाग म्हणून आयुक्तालयाच्या आस्थापनेवरील सर्व पोलिस उपायुक्त, सहायक पोलिस आयुक्त, पोलिस ठाणे प्रभारी अधिकारी आणि शाखा प्रमुख यांनी आपल्या कार्यक्षेत्रातच वास्तव्यास राहण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

याबाबत पोलिस आयुक्तालयाकडून परिपत्रक जारी करण्यात आले असून, वाढते शहरीकरण, गुन्हेगारीचे बदलते स्वरूप, कायदा व सुव्यवस्था, वाहतूक कोंडी, महिला व बाल अत्याचार, अवैध व्यवसाय, खंडणी, दरोडे आणि सराईत गुन्हेगारांवर नियंत्रण ठेवण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांची स्थानिक उपस्थिती आवश्यक असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. परिपत्रकानुसार, कोणतीही गंभीर घटना घडल्यास संबंधित अधिकारी तातडीने घटनास्थळी पोहोचणे अपेक्षित आहे. तसेच परिस्थितीचा आढावा घेऊन वरिष्ठांना वेळोवेळी माहिती देणे आणि कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणे ही जबाबदारीही अधिकाऱ्यांवर निश्चित करण्यात आली आहे.

फुगेवाडी विषारी दारूकांडानंतर स्थानिक पोलिसांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते. या प्रकरणात काही अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई झाली. त्यानंतर आयुक्त चौबे यांनी संपूर्ण यंत्रणेला अधिक उत्तरदायी बनविण्यासाठी विविध उपाययोजना सुरू केल्या आहेत. दोन दिवसांपूर्वीच प्रत्येक पोलिस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्याने आपल्या हद्दीत कोणतेही अवैध धंदे सुरू नसल्याचे प्रमाणपत्र सादर करावे, असा आदेश देण्यात आला होता. त्यानंतर आता अधिकाऱ्यांना त्यांच्या कार्यक्षेत्रातच वास्तव्यास राहण्याचे निर्देश देण्यात आल्याने पोलिस दलातील शिस्त आणि जबाबदारीबाबत आयुक्तालयाने गंभीर दखल घेतल्याचे स्पष्ट झाले आहे. दरम्यान, आयुक्तालयाच्या या निर्णयामुळे एखादी गंभीर घटना, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न किंवा गुन्हेगारीची घटना घडल्यास वरिष्ठ अधिकारी घटनास्थळी अधिक जलद गतीने पोहोचू शकतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. यामुळे प्रतिसादाचा कालावधी कमी होऊन नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीनेही सकारात्मक परिणाम होण्याची शक्यता आहे.



### कोणाला लागू होणार आदेश?

» यंदा जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराजांचा ३४१ वा आषाढी पायी वारी पालखी सोहळा ७ जुलै रोजी श्रीक्षेत्र देहू येथून पंढरपूरकडे प्रस्थान करणार आहे. त्यापूर्वी नवीन पालखी रथाचे सर्व काम पूर्ण करून तो सेवेसाठी सज्ज करण्यात येणार असल्याची माहिती श्री संत तुकाराम महाराज संस्थानचे विश्वस्त दिलीपमहाराज मोरे, वैभवमहाराज मोरे तसेच पालखी सोहळा प्रमुख विक्रमसिंह मोरे यांनी दिली.

### दारूकांडानंतर जबाबदारी निश्चित

» फुगेवाडी विषारी दारूकांडामुळे पिंपरी-चिंचवड पोलिसांची मोठी बदनामी झाली. या प्रकरणात अनेक निष्पाप नागरिकांचा मृत्यू झाला, तर स्थानिक पातळीवर अवैध धंद्यांकडे दुर्लक्ष झाल्याचे आरोपही झाले. त्यानंतर काही अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली. या पार्श्वभूमीवर आयुक्तालय आता शून्य सहनशीलतेचे धोरण अवलंबताना दिसत असून, प्रत्येक अधिकाऱ्याची वैयक्तिक जबाबदारी निश्चित करण्यावर भर दिला जात आहे.

“ नागरिकांची सुरक्षा, कायदा व सुव्यवस्था आणि गुन्हेगारीवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांची स्थानिक उपस्थिती अत्यंत महत्त्वाची आहे. कोणतीही घटना घडल्यानंतर तत्काळ प्रतिसाद मिळावा आणि जबाबदारी निश्चित व्हावी, यासाठी सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात वास्तव्यास राहणे आवश्यक आहे.

- विनय कुमार चौबे, पोलिस आयुक्त, पिंपरी-चिंचवड

# रेड झोनची हद्द तात्काळ निश्चित करा; नगरसेविका ऐश्वर्या तरस यांची मागणी

## मोजणी प्रक्रिया पूर्ण; हद्द निश्चितीअभावी नागरिक आणि विकासकामांमध्ये अडथळे

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दीतील रेड झोन क्षेत्राची हद्द तात्काळ कायम करण्यात यावी, अशी मागणी नगरसेविका ऐश्वर्या राजेंद्र तरस यांनी महापालिका आयुक्तांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

ऐश्वर्या तरस यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, महापालिकेमार्फत रेड झोन क्षेत्राची आवश्यक मोजणी प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे. मात्र, मोजणी पूर्ण होऊनही अद्याप संबंधित रेड झोनची हद्द अधिकृतपणे निश्चित करण्यात आलेली नाही. त्यामुळे या परिसरातील नागरिक, मालमत्ता धारक तसेच विकासकामांचे नियोजन करणाऱ्या संबंधित घटकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे.

हद्द निश्चित नसल्याने नागरिकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले असून विविध प्रशासकीय कामेही प्रलंबित राहत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे महापालिकेने पूर्ण झालेल्या मोजणीच्या आधारे रेड झोनची हद्द तातडीने कायम करून आवश्यक कार्यवाही करावी, अशी मागणी नगरसेविका ऐश्वर्या तरस यांनी केली आहे. या विषयाची गांभीर्याने दखल घेऊन प्रशासनाने लवकरात लवकर निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा ऐश्वर्या तरस यांनी व्यक्त केली आहे.






### हद्द निश्चितीमुळे नागरिकांचा संभ्रम दूर होणार

» पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीतील रेड झोन क्षेत्राची मोजणी प्रक्रिया पूर्ण झाली असली तरी अद्याप अधिकृत हद्द निश्चित करण्यात आलेली नाही. त्यामुळे नागरिक, मालमत्ताधारक आणि विकासकामांचे नियोजन करणाऱ्या विविध घटकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. हद्द स्पष्ट नसल्यामुळे बांधकाम परवानग्या, मालमत्ता व्यवहार आणि इतर प्रशासकीय प्रक्रिया रखडत असल्याचे नगरसेविका ऐश्वर्या तरस यांनी निवेदनात नमूद केले आहे. पूर्ण झालेल्या मोजणीच्या आधारे रेड झोनची हद्द तातडीने जाहीर केल्यास नागरिकांमधील संभ्रम दूर होऊन विकासकामांना गती मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

# शहरी गरीब योजनेत पारदर्शकतेसाठी महापालिकेचा पुढाकार

## चौकशी समितीच्या अहवालात महापालिकेची फसवणूक उघड; शिवाजीनगर पोलिसांकडे तक्रार दाखल

**पुणे | प्रतिनिधी**

शहरी गरीब योजनेत महापालिकेची फसवणूक केल्याप्रकरणात मॅग्रम रुग्णालयाविरोधात महापालिकेने शिवाजीनगर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. या प्रकरणी रुग्णालयाविरोधात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. शिवाजीनगर येथे हार्डीकर रुग्णालयाच्या आवारात हे मॅग्रम रुग्णालय आहे. सन २०१७ मध्ये या रुग्णालयाला शहरी गरीब योजनेच्या (एमपॅनल) यादीत समाविष्ट करण्यात आले होते.

तत्कालीन आरोग्य प्रमुख आणि शहरी गरीब योजना विभाग प्रमुख यांनी हा निर्णय घेतला होता. मात्र, आता त्यावेळी ज्यांनी या अर्जावर स्वाक्षरी केली होती. त्या त्यावेळी रुग्णालयाच्या पॅनलवर असलेल्या डॉक्टरांनी ही आपली स्वाक्षरी नाहीच, अशी तक्रार महापालिकेकडे केली आहे. तसेच, योजनेचा लाभ रुग्णालयाच्या ज्या नावाने अजूनही घेतला जात आहे ते आता अस्तित्वातच नसल्याची तक्रारही करण्यात आली आहे.

त्यामुळे तक्रारीवरून अतिरिक्त आयुक्त पवनीत कौर यांनी यावर दोन सदस्यीय चौकशी समिती गठित केली या चौकशी समितीने आपला अहवाल दिला असून, यामध्ये मॅग्रम रुग्णालयाने महापालिकेची फसवणूक केल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यामुळे या रुग्णालयाविरोधात तक्रार दाखल करण्याचे आदेश कौर यांनी शहरी गरीब योजना विभागाचे प्रमुख डॉ. सूर्यकांत देवकर यांना दिले. त्यांनी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात याविषयी तक्रार दिली आहे. यावरून पोलिसांनी रुग्णालयावर गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे.



### गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू

» चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर अतिरिक्त आयुक्त पवनीत कौर यांनी शहरी गरीब योजना विभागाला पुढील कायदेशीर कारवाई करण्याचे आदेश दिले. त्यानुसार विभागप्रमुख डॉ. सूर्यकांत देवकर यांनी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात अधिकृत तक्रार दाखल केली आहे. या तक्रारीच्या आधारे पोलिसांनी संबंधित रुग्णालयाविरोधात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. तपासादरम्यान कागदपत्रांची सत्यता, अर्ज प्रक्रिया आणि योजनेचा लाभ घेण्यामागील बाबींची छाननी केली जाणार आहे. या कारवाईमुळे महापालिकेच्या विविध योजनांमध्ये होणाऱ्या संभाव्य गैरव्यवहारांवर अंकुश बसण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### महापालिकेच्या चौकशीत अनियमितता उघड

» शहरी गरीब योजनेत समावेश मिळवताना मॅग्रम रुग्णालयाने महापालिकेची फसवणूक केल्याचा ठपका चौकशी समितीने ठेवला आहे. प्राप्त तक्रारींची दखल घेत अतिरिक्त आयुक्त पवनीत कौर यांनी दोन सदस्यीय समितीची नियुक्ती केली होती. समितीने सादर केलेल्या अहवालात विविध कागदपत्रांतील विसंगती आणि प्रक्रियेमधील त्रुटी निदर्शनास आल्याचे नमूद करण्यात आले आहे. या निष्कर्षानंतर प्रशासनाने संबंधित रुग्णालयाविरोधात तक्रार दाखल करण्याचा निर्णय घेतला. यामुळे शहरी गरीब योजनेच्या अंमलबजावणीत पारदर्शकता राखण्याबाबत प्रशासन अधिक सतर्क झाले असून अशा प्रकारांवर कठोर कारवाई करण्याचा संदेश देण्यात आला आहे.

### स्वाक्षरी व नोंदणीबाबत प्रश्नचिन्ह

» या प्रकरणातील सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे अर्जावरील स्वाक्षरी आणि रुग्णालयाच्या नोंदणीबाबत उपस्थित झालेले प्रश्न. योजनेत समावेशासाठी वापरण्यात आलेल्या अर्जावरील स्वाक्षरी आपली नसल्याचा दावा संबंधित डॉक्टरांनी केला आहे. तसेच ज्या नावाने रुग्णालयाला योजनेचा लाभ मिळत असल्याचे सांगितले जाते, त्या नावाची संस्था सध्या अस्तित्वात नसल्याची तक्रारही करण्यात आली आहे. या गंभीर आक्षेपांमुळे संपूर्ण प्रक्रियेवर संशय निर्माण झाला. त्यानंतर महापालिकेने संबंधित कागदपत्रांची सखोल पडताळणी केली आणि चौकशीचा मार्ग स्वीकारला. यामुळे प्रकरणाला नवे वळण मिळाले आहे.

# पुणेकरांवर दिवसआड पाणीपुरवठ्याचे संकट? पाणीप्रश्नी महापौरांच्या उपस्थितीत तातडीची बैठक

## खडकवासला धरणसाखळीत केवळ 20 टक्के पाणीसाठा; 25 टक्के बचतीसाठी प्रशासनाचा प्रस्ताव

**पुणे | प्रतिनिधी**

मान्सूनचे शहरातील आगमन लांबल्याने आणि खडकवासला धरण साखळीतील पाणीसाठा चिंताजनक पातळीवर पोहोचल्याने पुणेकरांवर दिवसआड पाणीपुरवठ्याचे संकट कायम आहे. संभाव्य पाणी संकटाच्या पार्श्वभूमीवर महापौरांच्या अध्यक्षतेखाली महापालिका प्रशासनाने तातडीची बैठक आयोजित केली आहे. शहर परिसराला दिवसाआड पाणीपुरवठा लागू करण्याच्या पाणीपुरवठा विभागाच्या प्रस्तावावर या बैठकीत अंतिम निर्णय होण्याची शक्यता आहे.

एल निनोमुळे पावसाचे प्रमाण कमी राहणार असून त्यातच मान्सूनचे आगमन लांबले आहे. यामुळे शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या धरणसाखळीत पुरेसा पाणीसाठा होईपर्यंत पुणेकरांवर पाणीकपातीचे संकट राहणार आहे. पाटबंधारे विभागाने दिलेल्या आकडेवारीनुसार, खडकवासला धरण साखळीची एकूण क्षमता २९.१५ टीएमसी आहे. सध्या धरणांमध्ये केवळ ५.८७५ टीएमसी (मंजूर कोट्याच्या तुलनेत केवळ २०.१५ टक्के) पाणीसाठा शिल्लक आहे.

शहराला दररोज सुमारे १५०० एमएलडी (दशलक्ष लिटर) पाण्याची आवश्यकता भासते. हा उपलब्ध साठा ३१ जुलैपर्यंत म्हणजेच मान्सून स्थिरावत नाही, तोपर्यंत पुरवणे हे प्रशासनासमोर मोठे आव्हान आहे. हवामान विभागाने यंदा सरासरीपेक्षा कमी पावसाचा अंदाज वर्तवला आहे. त्यातच मान्सून लांबणीवर पडण्याची शक्यता लक्षात घेऊन पाणीपुरवठा विभागाने आधीच पाणी कपातीचे नियोजन केले आहे.

सर्व अधीक्षक अभियंत्यांना त्यांच्या भागातील पाण्याच्या कपातीचे नियोजन तयार करण्याचे आदेश पाणीपुरवठा विभागाने आधीच दिले असून, त्यानुसार शहरात क्षेत्रनिहाय रोटेशन पद्धतीने एक दिवसाआड पाणीपुरवठा करण्याचा प्रस्ताव मुख्य अभियंत्यांनी तयार केला आहे. दर गुरुवारी पाणीपुरवठा बंद ठेवायचा की, एक दिवसाआड करायचा याविषयी मागील दोन महिन्यांपूर्वी चर्चा झाली होती.



### धरणातील पाणी साठा धोक्याच्या टप्प्यावर

» पुणे शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या खडकवासला धरण साखळीतील पाणीसाठा चिंताजनक पातळीवर पोहोचला आहे. धरणांची एकूण क्षमता २९.१५ टीएमसी असताना सध्या केवळ ५.८७५ टीएमसी पाणी शिल्लक आहे. मंजूर कोट्याच्या तुलनेत हा साठा अवघा २०.१५ टक्के आहे. मान्सूनचे आगमन लांबल्याने आणि पावसाचा वेग कमी असल्याने प्रशासनाची चिंता वाढली आहे. जुलैअखेरपर्यंत उपलब्ध पाणीसाठा पुरविण्याचे मोठे आव्हान महापालिकेसमोर उभे राहिले आहे. त्यामुळे पाणी बचतीसाठी विविध पर्यायांवर गांभीर्याने विचार सुरू आहे.

# पुरंदर विमानतळाच्या भूसंपादनासाठी 60 टक्के शेतकऱ्यांची संमती

## पुरंदर आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी आतापर्यंत 735.25 हेक्टर क्षेत्राचे भूसंपादन पूर्ण

**पुणे | प्रतिनिधी**

पुरंदर येथील प्रस्तावित आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या भूसंपादनासाठी आत्तापर्यंत ७३५.२५ हेक्टर क्षेत्राचे भूसंपादन करण्यास ६० टक्के शेतकऱ्यांनी मान्यता दिली असून भूसंपादनापोटी आत्तापर्यंत ९०० कोटी रुपयांचे वाटप करण्यात आल्याची माहिती जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिली. दरम्यान, येत्या दहा जून भूसंपादनाची अंतिम मुदत असल्याचेही त्यांनी सांगितले.

पुरंदर येथील आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी सात गावातून भूसंपादन करण्यात येणार आहे. त्यासाठी भूसंपादनाचा अंतिम दरही निश्चित करण्यात आला आहे. प्रकल्प बाधित शेतकऱ्यांना प्रतिएकर किमान एक कोटी ६१ लाख रुपये मिळणार आहेत. घर, फळबागा, बोअरवेल, बाधित घरांचा विचार करता जमिनीच्या मूळ दराच्या चौपटीपेक्षा दरानुसार सरासरी प्रति एकर दोन कोटी रुपयांपर्यंतची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होणार आहे.

मोबदल्याचे सूत्र निश्चित झाल्यानंतर सात मे पासून भूसंपादन करण्यास जिल्हा प्रशासनाकडून प्रारंभ करण्यात आला असून शेतकऱ्यांच्या खात्यात कागदपत्रांच्या पूर्ततेनंतर मोबदल्याची रक्कम जमा करण्यास करण्यात येत आहे. या प्रक्रियेने गेल्या दिवसांत वेग घेतला आहे. त्याबाबतची माहिती जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिली.

'वनपुरी येथील २६५ शेतकऱ्यांनी ११८ हेक्टर, उदाचीवाडी येथील ५९ शेतकऱ्यांनी २४ हेक्टर, कुंभारवळण येथील २५० शेतकऱ्यांकडून ११२ हेक्टर, पारगाव येथील ५८० शेतकऱ्यांकडील १०० हेक्टर, एकतपूर येथील २८८ शेतकऱ्यांकडून १४६ हेक्टर तर खानवडी आणि मंजुवडी येथील अनुक्रमे २६० आणि १७५ शेतकऱ्यांकडून १५० आणि ६५ हेक्टर क्षेत्र संपादित करण्यास मान्यता देण्यात आली असून आत्तापर्यंत ९०० कोटींच्या निधीचे वाटप करण्यात आले आहे,' असे डुडी यांनी सांगितले.



### भूसंपादनाला शेतकऱ्यांचा वाढता प्रतिसाद

» पुरंदर आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पासाठी सुरू असलेल्या भूसंपादन प्रक्रियेला शेतकऱ्यांचा सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. आतापर्यंत सुमारे ६० टक्के शेतकऱ्यांनी जमिनी संपादित करण्यास संमती दिली असून ७३५.२५ हेक्टर क्षेत्र संपादनासाठी मान्यता मिळाली आहे. जिल्हा प्रशासनाने निश्चित केलेल्या आकर्षक मोबदल्यामुळे अनेक शेतकरी पुढे येत आहेत. आवश्यक कागदपत्रांची पूर्तता होताच मोबदल्याची रक्कम थेट खात्यात जमा केली जात आहे. त्यामुळे प्रकल्पाविषयी विश्वास निर्माण झाला असून भूसंपादन प्रक्रियेला अपेक्षित गती मिळत आहे. प्रशासनानेही पारदर्शक आणि वेगवान कार्यपद्धती अवलंबल्याने शेतकऱ्यांचा प्रतिसाद वाढत असल्याचे दिसून येत आहे.

### १० जूनपर्यंत भूसंपादन पूर्ण करण्याचे लक्ष्य

» पुरंदर आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी एकूण १२१६ हेक्टर क्षेत्र संपादित करण्यात येणार आहे. त्यापैकी ७३५.२५ हेक्टर क्षेत्रासाठी संमती मिळाल्याने प्रकल्पाच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल पडले आहे. जिल्हा प्रशासनाने १० जून ही भूसंपादन प्रक्रियेची अंतिम मुदत निश्चित केली असून उर्वरित शेतकऱ्यांशी संवाद सुरू आहे. वनपुरी, उदाचीवाडी, कुंभारवळण, पारगाव, एकतपूर, खानवडी आणि मंजुवडी या सात गावांमध्ये प्रक्रिया वेगाने सुरू आहे. विमानतळ उभारणीमुळे पुणे जिल्ह्याच्या औद्योगिक, व्यावसायिक आणि पर्यटन विकासाला मोठी चालना मिळेल, अशी अपेक्षा प्रशासन आणि स्थानिक नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

### शेतकऱ्यांच्या खात्यात थेट रक्कम

» विमानतळ प्रकल्पासाठी भूसंपादनाच्या मोबदल्यापोटी आतापर्यंत ९०० कोटी रुपयांचे वाटप करण्यात आले आहे. सात गावांतील शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनी, घरे, फळबागा, बोअरवेल आणि इतर मालमत्तेच्या मूल्यांकनानुसार भरपाई दिली जात आहे. प्रतिएकर किमान १.६१ कोटी रुपये मिळत असून अनेकांना सरासरी दोन कोटी रुपयांपर्यंत लाभ मिळण्याची शक्यता आहे. मोबदल्याची रक्कम थेट बँक खात्यात जमा होत असल्याने प्रक्रिया पारदर्शक राहिली आहे. मोठ्या प्रमाणावरील निधी वाटपामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेलाही चालना मिळणार असून शेतकऱ्यांच्या आर्थिक सक्षमीकरणाला हातभार लागणार आहे.

# आता प्रत्येक बसमध्ये 'सीसीटीव्ही कॅमेरे' अन् 'पीएमपी'च्या साडेसात हजार थांब्यांचा कायापालट

## पुणे महानगर परिवहन मंडळाच्या (पीएमपी) सर्व बसमध्ये सुरक्षा आणि पारदर्शकतेसाठी 'सीसीटीव्ही कॅमेरे' आणि 'डॅश कॅम' बसवले जाणार आहेत.

**पुणे | प्रतिनिधी**

नागरिकांच्या तक्रारींचे निराकरण, अपघातांचे नेमके कारण शोधण्यासाठी पुणे महानगर परिवहन मंडळाच्या (पीएमपी) सर्व बसमध्ये 'सीसीटीव्ही कॅमेरे' आणि 'डॅश कॅम' बसवणार असल्याची माहिती 'पीएमपी'चे व्यवस्थापकीय संचालक महेश आव्हाड यांनी रविवारी दिली.

सजग नागरिक मंचाच्या वतीने आयोजित मासिक चर्चासत्रात ते बोलत होते. 'पीएमपी'च्या सह-व्यवस्थापकीय संचालक ॲलिस पोरे, मंचाचे अध्यक्ष विवेक वेलणकर, जुगल राठी, संजय शितोळे आदी या वेळी उपस्थित होते. आव्हाड म्हणाले, "पीएमपीएमएल'च्या गाड्यांचे वर्षाला सुमारे १० प्राणांतिक अपघात होतात. पोलीस अनेकदा मोठ्या वाहनचालकाला जबाबदार धरून गुन्हा नोंदवतात. मात्र, अनेकदा अपघातांमध्ये त्या वाहनचालकाचा दोष नसतो.'डॅश कॅम' मुळे अपघाताचे नेमके कारण समोर येईल. तसेच, सीसीटीव्हीमुळे सिग्नल तोडणे, झेब्रा क्रॉसिंगवर बस थांबवणे आदी बेशिस्त वर्तनावरही लक्ष ठेवता येईल.'

'दिवसाला दोन हजारांहून अधिक प्रवासी असलेल्या मार्गांवर बसची संख्या वाढवण्यात येणार आहे. मागणीनुसार बस देण्याचा विचार आहे,'असेही त्यांनी सांगितले.

आव्हाड म्हणाले,'रेल्वे स्थानक, विमानतळ, एसटी आणि मेट्रोतून उतरणाऱ्या प्रवाशांना लवकरात लवकर इच्छित स्थळापर्यंत जाण्यासाठी बसची संख्या आणि वारंवारिता वाढवण्यात येणार आहे. तसेच, प्रवाशांना बस आणि मेट्रोसाठी वेगळे तिकीट काढावे लागू नये म्हणून, 'वन नेशन वन कार्ड' धर्तीवर प्रयत्न करण्यात येत आहेत.'

'हे थांबे सौर ऊर्जेवर चालणारे असतील. प्रत्येक थांब्यावर दोन सीसीटीव्ही कॅमेरे, ध्वनिक्षेपक यंत्रणा आणि बसचे वेळापत्रक दाखवणारे डिजिटल माहितीफलक असतील. कचऱ्याचे डबे आणि शक्य झाल्यास पिण्याच्या पाण्याची सोयही बस थांब्यांवर उपलब्ध करून देण्याचा विचार आहे,' असेही त्यांनी नमूद केले.



### 'साडेसात हजार थांब्यांचा कायापालट'

» 'पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरात पीएमपीचे ९ हजार थांबे आहेत. त्यातील केवळ दीड हजार थांब्यांवर छप्पर आहे. उर्वरित साडेसात हजार थांबे 'एक पोल आणि पाटी' अशा अवस्थेत आहेत. आता सार्वजनिक-खासगी भागीदारीतून या थांब्यांचा कायापालट करणार असून, हायटेक थांब्याच्या बदल्यात त्या कंपनीला १५ वर्षांसाठी जाहिरातीचे अधिकार देण्यात येतील,' अशी माहिती महेश आव्हाड यांनी दिली.